## ठळक बातम्या

- केंद्र सरकार आगामी जनगणनेत जातनिहाय गणना करणार
- ऊसाला ३ हजार ५५० रुपये प्रतिटन FRP देण्याचा केंद्रिय मंत्रिमंडळाचा निर्णय /शिलाँग ते सिलचर महामार्ग प्रकल्पाला मंजुरी
- वेव्हज २०२५, अर्थात पहिली जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषद उद्यापासून मुंबईत सुरु होणार, प्रधानमंत्री करणार उद्घाटन

**आणि**

- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वार्षिक दरात घसरण

**<><><><><>**

आगामी जनगणनेत जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय केंद्रसरकारनं घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झालेल्या मंत्रीमंडळाच्या राजकीय विषयसंबंधी समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय झाला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर बातमीदारांना ही माहिती दिली. जातीनिहाय लोकसंख्या पारदर्शीपणे समजावी आणि समाजात ऐक्य स्थापन व्हावं हा या मागचा हेतू असल्याचं वैष्णव म्हणाले.

ऊसासाठी २०२५ च्या खरेदी हंगामाकरता ३ हजार ५५० रुपये प्रतिटन FRP अर्थात रास्त भाव देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. हा भाव उत्पादन खर्चाच्या १०५ टक्के अधिक आहे, याचा फायदा ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यात काम करणाऱ्या ५ लाख कामगारांना होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

शिलाँग ते सिलचर या महामार्ग प्रकल्पाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी २२ हजार ८६४ कोटी रुपये खर्च येणार आहे. १६६ किलोमीटरच्या या मार्गामुळे त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम आणि आसाम बराक खोरं यांच्यातला संपर्क सुधारणार आहे.

**<><><><><>**

जातनिहाय जनगणना करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्वागत केलं आहे. यामुळे गरजू नागरिकांच्या प्रगतीसाठी धोरणं आखायला यामुळे मदत होईल, असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या निर्णयाचं स्वागत केलं आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेनं केंद्र सरकारनं टाकलेलं हे महत्वपूर्ण पाऊल आहे, असं त्यांनी म्हटलंय.

तर केंद्र सरकारनं घेतलेला जात जनगणनेचा निर्णय फसवा असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. जनगणना कधी करणार याबाबत सरकारनं खुलासा केलेला नाही, असं त्यांनी म्हटलंय. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. मात्र, ही घोषणा बिहारच्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केली की काय अशी शंका येते असं ते म्हणाले.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केंद्र सरकारच्या जातनिहाय गणना करण्याच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. केंद्र सरकारनं उचललेलं हे पाऊल सकारात्मक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनीही केंद्र सरकारच्या या निर्णयाचं स्वागत केलं असून केंद्र सरकारचा हा निर्णय म्हणजे राष्ट्रीय जनता दलानं केलेल्या मागणीचा विजय असल्याचं म्हटलं आहे. जातनिहाय

जनगणनेबाबतचा धाडसी निर्णय घेतल्याबद्दल संपूर्ण देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ऋणी राहील, असं भाजपा नेते आणि बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पहिल्यावहिल्या वेव्ह्ज, अर्थात जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद २०२५ चं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर इथं होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेचा उद्देश, माध्यमं, मनोरंजन आणि डिजिटल नवोन्मेष क्षेत्रातली भारताची प्रतिभा अधोरेखित करणं, तरुणांसाठी नवनिर्मितीच्या अभिनव संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांना व्यासपीठ देणं, असा आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… व्हीसी- अंकिता आपटे**

*(वेव्ह्ज २०२५ साठी स्वप्ननगरी मुंबई सज्ज झाली आहे. १५ हजार वर्ग मीटर परिसरात पसरलेल्या या भव्य परिषदेत माध्यमं, मनोरंजन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या आघाडीच्या व्यक्ती, कंपन्या आणि या क्षेत्रात येऊ पाहणारी नवी प्रतिभा एकत्र येणार आहे. पहिलावहिला जागतिक माध्यम संवादही या परिषदेत होईल, याशिवाय, सर्जक आर्थिक क्षेत्राला चालना देण्यासाठी सर्वसमावेशक वेव्ह्ज बाजार आयोजित केला आहे. गेल्या जवळपास वर्षभराच्या कालावधीत देशभरात झालेल्या ३२ क्रिएट इन इंडिया चॅलेंजमधून निवडलेल्या स्पर्धकांचा क्रिएटोस्फिअर हेही वेव्ह्ज परिषदेचं आकर्षण आहे. ‘कला टू कोड’ या विषयावर आधारित भारत पॅव्हिलियन वेव्ह्जमध्ये उभारलं आहे. यात, कला, कृती, दृष्टी आणि क्रिएटर्स लीप या चार विभागांद्वारे भारताची समृद्ध कथाकथन परंपरा नागरिकांना अनुभवता येईल. याशिवाय विविध प्रदर्शनं, दालनं, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही वेव्ह्ज २०२५ मध्ये असणार आहे.*

*-आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून अंकिता आपटे.)*

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी वेव्हज परिषदेच्या उद्घाटनानंतर शुक्रवारी केरळला रवाना होणार असून तिथं विळिंजम आंतरराष्ट्रीय बंदराचं लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर आंध्र प्रदेशात अमरावती इथं ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटनही प्रधानमंत्री करणार आहेत.

<><><><><>

अखिल भारतीय शेतमजूर ग्राहक किंमत निर्देशांकाची पातळी गेल्या महिन्यात ३ पूर्णांक ७३ शतांशांपर्यंत तर ग्रामीण मजूर ग्राहक किंमत निर्देशांकाची पातळी ३ पूर्णांक ८६ शतांशांपर्यंत खाली आल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयानं म्हटलं आहे. गतवर्षीच्या तुलनात्मक कालावधीत हे निर्देशांक अनुक्रमे ७ पूर्णांक ७३ शतांश आणि ७ पूर्णांक ८ शतांश इतक्या पातळीवर होते.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वार्षिक दर ३ दशांश टक्क्यांनी घसरला. गेल्या ३ वर्षात पहिल्यांदाच या दरात घसरण झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत हा दर २ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वधारला होता.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातीवर अतिरीक्त शुल्क लादण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी होण्यापूर्वी अमेरिकी व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात आयात केली. ही आयात ४१ टक्क्यांपर्यंत

वाढल्यानं हा दर घसरला. या आयातीमुळं आर्थिक वृद्धी दरात ५ टक्क्यांची घसरण झाली.

**<><><><>**

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेली अक्षय्य तृतीया सर्वत्र आज साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना अक्षय्य तृतीयेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे पर्व सगळ्यांसाठी यश, वृद्धी आणि प्रसन्नता घेऊन येवो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महात्मा बसवेश्वर जयंती ही आज सर्वत्र साजरी होत आहे. समाजाप्रति महात्मा बसवेश्वर यांचा दृष्टीकोन आणि उपेक्षितांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही समाजाला मार्गदर्शन करत असल्याचं सांगत, प्रधानमंत्री मोदी यांनी बसवेश्वर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

चार धाम यात्रेलाही आजपासून सुरुवात झाली. अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे पारंपरिक पद्धतीनं उघडण्यात आले असून, केदारनाथ धामचे दरवाजे शुक्रवारी उघडतील आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे रविवारी उघडतील.

**<><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या कानपुर मधल्या शुभम द्विवेदी यांच्या कुटुंबीयांची आज भेट घेउन, त्यांची विचारपूस केली. दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करून सरकारनं या शोकग्रस्त कुटुंबांना न्याय द्यावा, असंही राहुल गांधी यांनी समाजमाध्यमत म्हटलं आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह ९ मे रोजी रशिया मधल्या मॉस्को इथं होणाऱ्या विजय-दिन संचलन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. खरं तर रशियानं प्रधानमंत्री मोदी यांना निमंत्रण दिलं होतं. पण या सोहळ्याला प्रधानमंत्र्यांऐवजी संरक्षण मंत्री उपस्थित राहणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं रशियाला कळवलं आहे.

<><><><><>

आंध्र प्रदेशात विशाखापट्टणमजवळ सिंहाचलम मंदिरात आज सकाळी दर्शन रांगेजवळची भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले. मुसळधार पावसामुळे एक तंबू कोसळल्यानंतर ही भिंत कोसळली. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलाच्या बचाव पथकांनी घटनास्थळी मदत कार्य सुरु केलं आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून आंध्र प्रदेशाचे गृहमंत्री आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

<><><><><>

आंध्र प्रदेशात नेल्लोरे जिल्ह्यात पोतीरेड्डिपालम इथं आज झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. त्यात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या ५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी एका वाहनातून जात असताना नियंत्रण सुटल्यानं त्यांचं वाहन एका घराला धडकलं. त्यावेळी त्या घरात असलेल्या एका व्यक्तीचाही, या अपघातात मृत्यू झाला. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईतल्या एम.ए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांचा सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या १२ षटकात ३ बाद १०८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**